चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२१ मार्च, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7276494810 (PRO)

# निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर माजरी पोलीसांची कार्यवाही २० लक्ष रोकड जप्त

दिनांक २७/०९/२०१९ रोजी निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर पोलीस स्टेशन माजरी अंतर्गत पाटाळा फाटा वणी वरोरा रोड येथे एसएसटी पॉईन्टवर नाकाबंदी दरम्यान एका सरकारी बसमधुन २० लक्षची रोख रक्कम जप्त करण्यात आलेली आहे.

पोलीस स्टेशन माजरी अंतर्गत आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर आज दिनांक २७/०९/२०१९ रोजी १६/३० वाजेच्या सुमारास पाटाळा फाटा वणी वरोरा रोड येथे एसएसटी पॉईन्ट नाकाबंदी लावण्यात आलेली होती. सदर ठिकाणी वाहनाची तपासणी करीत असतांना बस क्र. एमएच ४० वाय ५८९४ या वाहनाची तपासणी दरम्यान बसचे सिटच्या मागील बाजुस एका बॅगमध्ये रूपये रोख २० लक्ष रू मिळुन आले. सदर रोख रक्कम बाबत बस चालक आणि इतर प्रवाशी यांना विचारपुस केली असता सदर बॅग ही कोणाच्या मालकीची आहे याबाबत कोणालाही माहीत नसल्याचे सांगीतले. सदरची रक्कम जप्त करून जिल्हाधिकारी कार्यालय निवडणुक अधिकारी वरोरा यांचे कडे पाठविण्यात आली आहे. पुढिल तपास माजरी पोलीस करीत आहे.

सदरची कार्यवाही कृषी पर्यवेक्षक भरडे, कृषी अधिकारी एसएस सावळे, पोहवा. भास्कर लडके, पोशि. प्रदिप गाडेकर यांनी केली.

---